## Arts & Commerce College, Warwat Bakal
## Tq. Sangrampur Dist. Buldana

### Research Papers 2023-2024

| Sr. No | Title of Paper | Name of Author | Department | Journal | Year | Impact Factor |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Impact of irrigation | S. R. Gurjar | Economics | Akshara Multidisciplinary research journal | Dec-2023 | |
| 2 | Contribution of Dr. Panjabrao Deshmukh in economic thought and social field | S. R. Gurjar | Economics | Research Nebula An international refereed peer reviewed quarterly journal in Arts, Commerce, Education & Social sciences | Feb-2024 | |
| 3 | Nobel Laureate Dr Claudia Goldin's Economic Thoughts on Women and the Labor Market | S. R. Gurjar | Economics | Ajanta An international multidisciplinary quarterly research journal | March-2024 | |
| 4 | A need for quality in research guidance | S. R. Gurjar | Economics | “Royal”An international multidisciplinary half yearly research journal | May-2024 | |

E-ISSN 2582-5429
SJIF Impact - 5.675

# AKSHARA
## MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

October- December 2023 Volume 04 Issue IV



Chief Editor :
Dr. Girish S. Koli

CamScanner

# Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

October- December2023

Volume 04 Issue IV

Scientific Journal of Impact Factor (SJIF) Impact-5.67

Scientific Journal Impact Factor
TOGETHER WE REACH THE GOAL

International Impact Factor Services

International Society for Research Activity (ISRA)
Journal-Impact-Factor (JIF)

Digital Online Identifier-
Database System

Akshara Publication
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon Maharashtra 425201

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal

Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal

October- December 2023 Volume 04 Issue IV

SJIF Impact- 5.67


| Sr.No | Title of the Paper | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 28 | महाविद्यालयीन स्तर पर अध्ययनरत छात्र-छात्राओं की शैक्षिक उपलब्धि पर प्रसन्नता के प्रभाव का अध्ययन | प्रा. सुनीता अरविंद जगताप | 115 |
| 29 | मराठी साहित्याला सशक्त करणारी प्रा. आ. य. पवारांची विज्ञान कविता | प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर | 118 |
| 30 | जलसिंचन व त्याची परिणामकारकता | प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर | 123 |
| 31 | कवयित्री रुक्मिणीबाई तुकाराम पाटील व उर्फ वैदर्भी बहिणा | प्रा. डॉ. अनंत वराडे | 126 |
| 32 | आधुनिक मराठी ख्रिस्ती साहित्याचे योगदान | प्रा. दीपक संतोष पवार | 129 |
| 33 | 'अवकाळी पावसाच्या दरम्यानची गोष्ट'कादंबरीमध्ये ग्रामविश्वाचे चित्रण | प्रा.कोटरंगे दत्ता नामदेव | 132 |
| 34 | विकासाबाबतचा आदिवासींचा दृष्टिकोन आणि नक्षलग्रस्त जिल्ह्यासाठीची एकात्मिक कृती योजना | प्रा.डॉ.विशाल दिलीप वाणी | 135 |
| 35 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार | डॉ.संभाजी संतोष पाटील | 140 |
| 36 | अध्यापक विद्यालयातील छात्राध्यापकांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतीतील बदल | शैलेश गायकवाड<br>डॉ. राजश्री मेश्राम | 145 |
| 37 | दलित काव्य एक जीवनदर्शन | प्रा. नवाजी गेंदलाल घरत | 151 |
| 38 | 'ऊसकोंडी' ग्रामीण कादंबरीतील कृषीजीवन | प्रा.डॉ.दिनेश हिंमतराव पाटील | 156 |
| 39 | समाज जीवनात प्रसार माध्यमांची भूमिका | श्री विलास बन्सी दांडगे | 159 |
| 40 | ग्रामगीतेतील ग्रामशुध्दी | प्रा. डॉ. अनंत वराडे | 163 |


CS CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
October- December 2023 Volume 04 Issue IV SJIF Impact- 5.67

30

# जलसिंचन व त्याची परिणामकारकता

प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर
कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, ता.संग्रामपूर जि. बुलढाणा

**प्रस्तावना :-**

जल ही जीवन आहे. जीवन जगण्याकरिता जसे हवा, सुर्यप्रकाश, अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची आवश्यकता आहे, त्याचप्रमाणे मानवाला व सजीवांना जिवंत राहण्याकरिता पाण्याची नितांत गरज आहे. मानवी शरीराचा 2/3 भाग पाण्याने व्यापलेला आहे. पाण्यावर शेती, उद्योग, व मानवाचा विकास अवलंबून आहे. पाण्याचे प्रामुख्याने द्रवरूप, बाष्परूप व घनरूप अशा तीन स्वरूपामध्ये वास्तव्य आहे. पृथ्वीवरील 71% भाग जलव्याप्त आहे. पृथ्वीवरील एकूण पाण्यापैकी 97% पाणी खारे आहे. तर पिण्यायोग्य पाणी 3% असून त्यामध्ये भूपृष्ठावरील पाणी 0.3%, भूगर्भातील पाणी 0.7%, व बर्फाच्या स्वरूपात 2% पाणी आस्तित्वात असून भूपृष्टीय ०.3% पाण्यापैकी नदया, सरोवरे व झ-याच्या स्वरुपात 0.2%, मातीतील आर्द्रता 0.05%, वातावरणातील बाष्प व इतर स्वरुपात 0.05% पाणी अस्तित्वात आहे. त्यामुळे केवळ 1% च पाणी मानवाच्या वाट्याला येते. त्या पाण्याचाच आपल्याला विकासाच्या दृष्टीने उपयोग करता येतो. भारतात प्रामुख्याने 90% पाणी शेतीकरिता, 7% पाणी उद्योगाकरिता व 3% पाणी पिण्याकरिता वापरण्यात येते. त्यामुळे पाण्याची बचत हेच पाण्याचे उत्पादन आहे. याच पाण्याचा शेतीकरिता वापर करून शेतीचा विकास करणे.हे एक महत्वाचे आव्हान शेतकरी वर्गासमोर उभे आहे.

**जलसिंचन :-**

मानवाचा, शेतीचा व उद्योगाचा सर्वस्वी विकास हा पाण्यावरच अवलंबून आहे. शेती विकासाच्या दृष्टीने पाण्याला अनन्यसाधारण महत्व आहे. शेतीची उत्पादकता वाढविण्याच्या दृष्टीने शेतीला नियमित व पुरेशा प्रमाणात पाण्याची आवश्यकता असते. आधुनिक शेतीपद्धतीमध्ये पाणी वितरणाच्या नवनविन पद्धती संशोधकांनी शोधूनकाढल्या आहेत. त्यापैकी तुषार सिंचन पद्धती व ठीबक सिंचन पध्दती महत्वपूर्ण आहेत.

**"पाण्याच्या उगमापासून शेतीतील पिकांपर्यंत पाण्याची वाहतूक व वितरण पद्धतशीरपणे करण्याच्या क्रियेला जलसिंचन असे म्हणतात "**

**"पाण्याच्या उगमापासून शेतापर्यंत पाणी वाहून नेणे व पुढे त्याचे शेतात योग्य प्रमाणात वितरण करणे म्हणजे जलसिंचन होय"**

पाण्याच्या कमीत कमी वापरात जास्तीत जास्त उत्पादन हा मुख्य हेतू जलसिंचन आराखडा बनवितांना विचारात घेतल्या जातो.

**जलसिंचनाचे उद्देश :-**

1. पिकांची उत्पादकता वाढविणे.
2. पाण्याच्या उगमापासून शेतीपर्यंत कमीत कमी -हास करून पाणी वाहून नेणे.
3. शेतीतील पिकांना पाण्याचे योग्य विभाजन व वितरण करणे.
4. शेतात उपलब्ध असलेल्या पाण्याचे योग्य नियंत्रण करणे.
5. सिंचनाच्या माध्यमातून पिकांचे योग्य संरक्षण करणे.

**जलसिंचनाची आवश्यकता :-**

शेतीला पाण्याची योग्य आवश्यकता असते. मान्सूनच्या पावसावर अवलंबून असणाऱ्या कोरडवाहू शेतीचे उत्पादन अनिश्चित स्वरुपाचे असते. भारतातील पाऊस अनियमित, अनिश्चित व विषम स्वरुपात पडतो. त्यामुळे शेतीतील उत्पादनावर त्याचा विपरित परिणाम होतो.शेतीच्या उत्पादनात निश्चितता यावी व एकापेक्षा जास्त पिके घेता यावी. याकरिता जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध असणे महत्वाचे आहे. जलसिंचनामुळे आधुनिक पद्धतीने शेती करणे व शेतीचे उत्पादन

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
October- December 2023 Volume 04 Issue IV SJIF Impact- 5.67

वाढविणे शक्य आहे. ज्या भागात पावसाचे प्रमाण अल्प असते, अशा प्रदेशात शेती उत्पादनात होणारे नुकसान टाळण्याकरिता सिंचनाची आवश्यकता असते. पिकपद्धतीमध्ये काही पिकांना कमी तर काही पिकांना अधिक पाण्याची आवश्यकता असते. जलसिंचनामुळे शेतीमध्ये आंतरपीक व वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेता येत असल्यामुळे उत्पादकतेत वाढ होऊन लोकांना अधिक रोजगार प्राप्त होतो. जलसिंचनाच्या साधनाकरिता कालवे खोदणे, तलाव बांधणे, धरणे बांधणे याकरिता श्रमिकांना रोजगार उपलब्ध होतो. त्याचप्रमाणे शेतीच्या विकासाबरोबरच औद्योगिक विकासात वाढ होत असल्यामुळे आयात निर्यातीच्या माध्यमातून विदेशी चलनाचा पुरवठा देशाला होतो. तात्पर्य देशाच्या विकासात जलसिंचनाची आवश्यकता दिसून येते.

**जलसिंचनाचे महत्व :-**

1. **अपूरा व अनियमित पाऊस :-** महाराष्ट्रात पावसाळ्यात चार महिने पाऊस पडतो तो सुद्धा अनियमित, अपुरा,कुठे जास्त कुठे कमी अशा स्वरुपात पडतो. उरलेल्या आठ महिन्यात पाऊस पडत नाही. पडल्यास अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान होते अशावेळी पिकांना योग्य वेळी व योग्य प्रमाणात पाणी देण्यासाठी जलसिंचन उपयुक्त ठरते.परिणामी शेतीचे नुकसान कमी होण्यास मदत मिळते.
2. **पिकांची विविधता :-** मान्सूनवर अवलंबून असलेल्या शेतीमधून फक्त एकाच प्रकारचे पिक घेता येते. परंतु जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध झाल्यास वर्षातून एकापेक्षा जास्त पिके घेता येते. त्यातून उत्पादकता वाढून शेतक-यांचे उत्पन्नात वाढ होण्यास मदत मिळते.
3. **उत्पन्नातील अस्थिरता कमी करणे :-** मान्सूनवर अवलंबून असलेल्या कोरडवाहू शेतीतून येणा-या उत्पन्नात कमालीची अस्थिरता असते. परंतु जलसिंचनाच्या सोयी उपलब्ध झाल्यास शेतीतील उत्पन्नात काही प्रमाणात स्थिरता आणण्यास मदत मिळते.
4. **आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर :-** जलसिंचनाच्या साधनांमुळे शेतीमध्ये नविन व आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येतो. शेतीमध्ये संकरीत बी-बियाणे, रासायनिक खते यांचा वापर करण्यास प्रोत्साहन मिळते.
5. **उत्पादकतेत वाढ :-** कोरडवाहू शेतीपेक्षा सिंचनाखाली असलेल्या शेतीची उत्पादकता जास्त असते, त्याचप्रमाणे त्यामध्ये उत्पादन वैचित्र्य आढळून येत असल्यामुळे शेतीची उत्पादकता वाढण्यास मदत मिळते.
6. **रोजगारक्षमतेत वाढ :-** कोरडवाहू शेतीमध्ये हंगामी रोजगार मिळतो. परंतु जलसिंचनामुळे शेतीमध्ये एकापेक्षा जास्त पिके घेता येत असल्यामुळे शेतीमध्ये वर्षभर रोजगार प्राप्त होतो. त्यामुळे रोजगार क्षमतेमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होते.

**जलसिंचनाच्या समस्या :-**

1. **खर्च लाभ गुणोत्तर कमी :-** जलसिंचन प्रकल्प उभारण्यासाठी मोठ्या प्रमाणात खर्च होतो, परंतु त्यातुलनेने मिळणारे लाभ मात्र कमी प्रमाणात मिळतात. त्याचप्रमाणे सिंचनाची सोय झाल्यानंतर उत्पादनात अपेक्षित प्रमाणात वाढ झाली नाही.
2. **पाण्याचा गैरवापर :-** जलसिंचन प्रकल्पातील पाणी उघड्या, पाझर असणा-या कालव्यातून शेतीला पुरविले जाते. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जाते. शेतीला गरजेपेक्षा जास्त पाणी वापरले जाते परिणामी शेतीमध्ये पाणी साचून शेतीची सुपीकता कमी होते.
3. **सिंचनक्षमतेचा अपूरा वापर :-** सिंचन प्रकल्पामधून निर्माण झालेली क्षमता व प्रत्यक्ष वापरात आणलेली क्षमता यामध्ये तफावत आहे. कालव्याची कामे पूर्ण होण्यास दिरंगाई, पावसाळ्यात प्रकल्पांच्या पाण्याचा शेतक-यांकडून वापर न होणे ही एक समस्या दिसून येते.
4. **क्षारपाड जमिनीच्या प्रमाणात वाढ :-** शेतीला कालव्यामार्फत कधी कधी अतिरिक्त पाणी दिल्या जाते त्यामुळे जमिनी सतत ओलसर राहतात व त्यातून जमिनीमध्ये क्षाराचे प्रमाण वाढत जाते.
5. **पीकपद्धती संबंधी समस्या :-** जलसिंचनामुळे पाणी उपलब्ध झाल्यामुळे शेतकरी कमी पाण्यावर येणा-या पिकांऐवजी जास्त पाणी लागणारी पिके घेण्यास प्राधान्य देतात. त्यामुळे धान्य पिकांच्या खालील क्षेत्र कमी होतांना दिसते.



CamScanner

E- ISSN 2582-5429
AMRJ
Akshara Multidisciplinary Research Journal
Single Blind Peer Reviewed & Refereed International Research Journal
October- December 2023 Volume 04 Issue IV SJIF Impact- 5.67

6. **नैसर्गिक असमतोल :-** मोठ्या प्रकल्पापासून मिळणारे फायदे अधिक असतात. त्यामानाने लघु व मध्यम प्रकल्पाद्वारे मिळणारे फायदे कमी असतात. काही भागामध्ये नैसर्गिक रचनेमुळे प्रकल्प उभारणे सहज शक्य होते. त्या भागात सिंचनाच्या सोयी मोठ्या प्रमाणात उपलब्ध होतात, तर काही भागात निसर्गाच्या प्रतिकुलतेमुळे प्रकल्प उभारणे शक्य होत नाही, त्यामुळे त्या भागात सिंचनाच्या सोयी उपलब्ध होत नाही.त्यामुळे सिंचन सुविधेमध्ये नैसर्गिक असमतोल दिसून येतो.
7. **पाण्याच्या बाष्पीभवनाचा प्रश्न :-** जलाशयातून, कालव्यातून सिंचन क्षेत्रातून पाण्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणात होते. मोठ्या सिंचन प्रकल्पातून 14%, मध्यम प्रकल्पातून 23% व लहान प्रकल्पातून 24% पाण्याचे बाष्पीभवन होते. परिणामी पाण्याची उपलब्धता कमी होते. त्यामुळे बाष्पीभवन कमी करणे आवश्यक ठरते.

**जलसिंचनाचे परिणाम :-**

1. **पिकपद्धतीत बदल :-** पूर्वी कोरडवाहू शेतीमध्ये वर्षातून एकच पिक घेतल्या जात होते, परंतु सिंचनाच्या सोयीमुळे आज शेतकरी वर्ग शेतीमध्ये एकापेक्षा जास्त पिके घेतली जातात.
2. **व्यापारी शेती :-** सिंचन सुविधा प्राप्त होण्यापूर्वी शेतीकडे केवळ उदरनिर्वाहाचे साधन म्हणून पाहिले जात होते.त्यामुळे उत्पादनाचे प्रमाण कमी होते.परंतू आज सिंचन सोयी निर्माण झाल्यामुळे आधुनिक पध्दतीने व व्यावसायिक दृष्टीने शेती केली जात आहे.
3. **उत्पादकतेत व उत्पन्नात वाढ :-** जलसिंचन सोयीमुळे नविन यंत्रे, संकरित बी-बियाणे, रासायनिक खते, किटकनाशके यांचा वापर वाढल्यामुळे शेतीची उत्पादकता वाढून शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदत झाली.
4. **रोजगारात वाढ :-** जलसिंचनाच्या सोयीमुळे नविन तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीतून वर्षभर विविध पिके घेतल्या जात असल्यामुळे रोजगाराच्या संधीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते.
5. **आर्थिक विकासाला उत्तेजन :-** जलसिंचनाच्या सोयीमुळे अन्नधान्य व व्यापारी पिकाचे उत्पादन वाढल्यामुळे औदयोगिक विकासाला चालना मिळाली आहे.
6. **परकीय चलनाची उपलब्धता :-** जलसिंचन सोयीमुळे आधुनिक पध्दतीने शेती केल्या जात असल्यामुळे फळे, भाजीपाला, औषधी वनस्पती इत्यादी कृषी मालाची निर्यात वाढल्यामुळे त्यातून विदेशी चलन प्राप्त होत आहे.

**मुल्यमापन :-**

शेतीच्या व औदयोगिक विकासात जलसिंचनाच्या सोयीचे अनन्यसाधारण महत्व असल्याचे सिद्ध होते. सिंचनाच्या सोयींमुळे शेतीची उत्पादकता वाढून, रोजगारीत वाढ, शेतक-यांच्या उत्पन्नात वाढ, राहणीमानात वाढ, विदेशी व्यापारात वाढ, पशुधनात वाढ, कृषि आधारित उद्योगात वाढ, औद्योगिक विकासात वाढ होत असतांना दिसून येते. परंतु अजूनपर्यंतही देशात सिंचनाच्या सोयीमध्ये ज्या प्रमाणात वाढ व्हायला पाहिजे, त्या प्रमाणात वाढ झालेली दिसून येते नाही. देशाच्या जलद व निरंतर विकासासाठी जलसिंचन सोयींमध्ये वाढ होणे आवश्यक ठरते.

**संदर्भ :-**

1. मोरे दि. मा. (2011), 'सिंचन चिंतन महाराष्ट्र सिंचन सहयोग, औरंगाबाद.
2. पाणी विशेषांक, लोकराज्य, ऑगष्ट 2012, महाराष्ट्र शासन.
3. पाणलोट क्षेत्र विकास मार्गदर्शिका, (2003), जलसंधारण व कृषी विभाग, महाराष्ट्र शासन.
4. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी : पर्यायी दृष्टीकोन, (2015), श्रमिक प्रतिष्ठाण, को



CamScanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SJF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

J-Gate INDEXED

ISSN 2277-8071

Indexed in the ICI Journals Master List

INDEX COPERNICUS INTERNATIONAL

# RESEARCH NEBULA

*An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences*

DOI PREFIX 10.22183 JOURNAL DOI 10.22183/RN IMPACT FACTOR 7.399

## TWO - DAY 47th ANNUAL CONFERENCE OF
# VIDHARBHA ARTHASHASTRA PARISHAD

**3rd & 4th February, 2024**

*Organized by*

# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

**MIDC Road Complex, Gadchiroli-442605, MH. (India)**

Guest Editor
**Dr. Shriram Kawale**
Pro Vice - Chancellor,
Gondwana University,
Gadchiroli.

Executive Editor
**Dr. Shilpa Athawale**
Coordinator, PGTD of Applied Economics,
Gondwana University,
Gadchiroli.

**Special Issue Published on 3rd February, 2024**
www.ycjournal.net

| | | | |
|---|---|---|---|
| 10. | **PRIYANKA RUPALAL DAKAHA**<br>Student of Economics Department,<br>RTM Nagpur University,<br>Nagpur | The Changing Nature of Development Theory After Covid-19 | 87 |
| 11. | **DR. ISHWAR WAGH**<br>Assistant Professor,<br>Smt. Rajkamal baburao Tidke<br>Mahavidyalaya, Mouda. | The Visioner - Dr. Punjabro Deshmukh | 92 |
| 12. | **प्रा.डॉ.नीता नंदलाल तिवारी**<br>अर्थशास्त्र विभाग प्रमुख,<br>श्री धाबेकर कला महाविद्यालय,खडकी,अकोला | डॉ. पंजाबराव देशमुख के आर्थिक विचार | 95 |
| 13. | **डॉ. विजय के. बनसोड**<br>प्राध्यापक व अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>डॉ. एम. के. उमाठे कॉलेज, नागपूर | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 99 |
| 14. | **डॉ. राजेंद्रकुमार रामराव गव्हाळे**<br>प्राध्यापक तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख, जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय,<br>खामगांव, जि. बुलढाणा<br>**डॉ. दिलीप पांडुरंग महाजन**<br>प्राध्यापक तथा विभाग प्रमुख, एस. पी. एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणीज्य महाविद्यालय,<br>चिखली, जि.बुलढाणा | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे शेतीपूरक जोडधंद्यासबंधी आर्थिक विचार | 104 |
| 15. | **डॉ.हनुमंत अंकुशराव भोसले**<br>सहाय्यक प्राध्यापक,<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग जी.एस कॉलेज, खामगाव<br>**डॉ प्रदिप विठ्ठलराव ताकतोडे**<br>सहाय्यक प्राध्यापक,अर्थशास्त्र विभाग प्रमुख<br>कला महाविद्यालय, मलकापूर अकोला<br>**डॉ; नितीन ज्ञानदेव चौधरी**<br>सहाय्यक प्राध्यापक, विभाग प्रमुख<br>पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग<br>श्रीमती राधादेवी गोयनका महिला महाविद्यालय अकोला | डॉ. पंजाबराव देशमुख यांचे कृषी विषयक विचार | 110 |
| 16. | **प्रा.डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर**<br>कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, जि. बुलढाणा | डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार व सामाजिक क्षेत्रातील योगदान | 116 |

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

Two - Day 47th Annual Conference of Vidharbha Arthashastra Parishad
@ Gondwana University, Gadchiroli.
3rd & 4th February, 2024

प्रा.डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर
कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, जि. बुलढाणा
Mail : gurjarsr11@gmail.com

# डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार व सामाजिक क्षेत्रातील योगदान

***ABSTRACT***

स्वतंत्र भारताचे पहीले कृषिमंत्री डॉ.पंजाबराव देशमुख यांचा जन्म पापळ जि.अमरावती येथे 27 डिसेंबर 1898 रोजी झाला. त्यांचे मुळ आडनाव कदम असून वतनदारीमुळे त्यांना देशमुख हे नाव प्राप्त झाले. त्यांचे प्राथमिक शिक्षण जन्मगावी, माध्यमिक शिक्षण अमरावती येथे, १०वी नंतर फर्ग्यूसन महाविदयालय येथे झाले. पुढे उच्च शिक्षणासाठी ते इंग्लंडला गेले. त्यांनी एडींबरो विद्यापीठाची एम.ए.व ऑक्सफर्ड विद्यापीठाची डी.फील.पदवी प्राप्त केली. ऑक्सफर्ड विद्यापीठात प्रा. ए.ए.मॅगडॉनल यांच्या मार्गदर्शनाखाली "वैदिक वाङ्मयात धर्माचा उद्गम, विकास व त्यांचा पारस्पारिक संबंध" हा विषय पीएच.डी. साठी निवडला होता, परंतू संशोधन पूर्ण होईपर्यंत त्यांना इग्लंडला राहणे आवश्यक होते. ते त्यांना पैशाच्या अडचणी मुळे शक्य नव्हते. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत विषयातील 'परस्पर संबंध' हे प्रकरण कमी करून प्रबंध सादर केला. त्या आधारावर त्यांना डॉक्टरेट पदवी बहाल केली. हा प्रबंध जून 1933 मध्ये ऑक्सफर्ड विद्यापीठ प्रेसने प्रकाशित केला. इंग्लंडमध्ये त्यांनी बार-ॲट-लॉ ची पदवी प्राप्त केली. भारतात परतल्यानंतर त्यांनी अमरावती येथे वकीली सुरू केली. 1930 मध्ये त्यांची प्रांतिक कायदेमंडळावर निवड झाली. आणि ते शिक्षण, कृषी, सहकार खात्याचे मंत्री बनले. भारताच्या घटना समितीत त्यांनी सदस्य म्हणून काम पाहिले. 1952, 1957, 1962 या तीन वेळा त्यांची लोकसभेवर निवड झाली. आणि 1952 से 1962 या काळात ते केंद्रीय मंत्रीमंडळात कृषीमंत्री होते.

**प्रस्तावना :**

26 नोव्हेंबर 1927 रोजी मुंबई येथील सोनार जातीतील विमलाबाई वैदय यांच्यासोबत मुंबईच्या प्रार्थना समाजमंदिरात साध्या पध्दतीने त्यांचा आंतरजातीय विवाह झाला.त्यामुळे समाजाचा त्यांना विरोध झाला. तरीपण त्यांनी आपल्या पत्नीचे बि.ए.एल.एल.बी. पर्यंत शिक्षण पूर्ण करून घेतले. त्यांच्या पत्नीने त्यांना अनेक सामाजिक कार्यात साथ दिली. मे 1930 च्या पहिल्या आठवड्यात खादीच्या प्रचारासाठी त्यांनी जिल्हाभर प्रचारयात्रा केल्या.तसेच त्यांनी स्वातंत्र्य चळवळीत सुद्धा भाग घेतला. 1928 मध्ये ते अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. त्यांनी अमरावती मध्यवर्ती बँकेचे अध्यक्षपद भूषविले. त्यानंतर काही काळ त्यांनी देवास संस्थानात राजकीय मंत्री म्हणूनही काम पाहिले. अशाप्रकारे त्यांनी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, सहकार, आर्थिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे :-**



CamScanner

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

1) डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या आर्थिक विचाराचे अध्ययन करणे.

2) डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक कार्याचे अध्ययन करणे.

3) डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या इतर कार्याचे अध्ययन करणे.

**डॉ.पंजाबराव देशमुख यांचे आर्थिक विचार :-**

डॉ.पंजाबराव देशमुख यांनी कोणत्याही प्रकारचे आर्थिक सिद्धांत मांडले नसले तरी त्यांनी आर्थिक बाबतीत मांडलेले विचार महत्वपूर्ण असल्याचे सिद्ध होते. डॉ.पंजाबराव देशमुख यांनी शेतक-यांची दैनावस्था, त्याचे मागासलेपण, कर्जबाजारीपणा, पिळवणूक व अडचणी यांचे निरिक्षण केले होते. या अवस्थेतून त्यांची सुटका व्हावी व प्रगती घडवून आणण्यासाठी त्यांनी वेगवेगळ्या प्रकारची उपाययोजना केली, 1927 मध्ये त्यांनी "शेतकरी संघाची" स्थापना केली. त्यांच्या प्रचारासाठी व शेतकयांच्या जागृतीसाठी 'महाराष्ट्र केसरी' हे वृत्तपत्र चालविले. शेतक-यांचे दारिद्रय व मागासलेपण दूर व्हावे. त्यांच्यावरील अन्यायाचे निवारण व्हावे, शेतक-यांची सावकार, व्यापारी व दलाल यांच्या तावडीतून सुटका व्हावी, शेतमालाला योग्य भाव मिळावा, याकरिता मोठ्या प्रमाणावर कार्य केले.1952 मध्ये कृषिमंत्री झाल्यानंतर त्यांनी शेतकरी हिताच्या विविध योजना आखून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. शेतक-यांनी शेतीमध्ये प्रगत तंत्रज्ञानाचा अवलंब करावा म्हणून प्रयत्न केले. त्याकरिता विदेशी शेती व्यवसायाचा अभ्यास करून त्यातील चांगल्या प्रयोगाचे अनुकरण करून आपले उत्पादन वाढवावे.याकरिता देशव्यापी मोहीम उघडून विविध खते, उत्कृष्ट बी-बियाणे यांची माहिती करून देण्याचा प्रयत्न केला.

शेतक-यांना प्रशिक्षण, नवनविन प्रयोगाची माहिती, कृषी प्रदर्शनी, चर्चासत्रे संमेलने परदेशातील कृषीज्ञानाची, देवाण-घेवाण होण्याच्या दृष्टीने त्यांनी 1955 मध्ये "भारत कृषक समाज' या संस्थेची स्थापना केली, त्याद्वारे "राष्ट्रीय कृषी सहकारी खरेदी-विक्री संघाची"स्थापना झाली. तसेच कृषी उत्पादकांच्या आंतरराष्ट्रीय संघटनांचा संघ, आफ्रो- आशियाई ग्रामिण पुनर्रचना संघटना द्वारे शेतक-यांना मदत केली. कृषीक्षेत्राचे ज्ञान व्हावे म्हणून 1960 मध्ये त्यांनी दिल्ली येथे 'जागतिक कृषी प्रदर्शन' भरविले. शेतकऱ्यांनी प्रगत तंत्रज्ञानाचा वापर व विकास करावा असे त्यांचे मत होते. त्यांच्या कार्याचे स्मरण म्हणून अकोला येथे त्यांच्या नावे डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ स्थापन करण्यात आले. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून त्यांना 'कृषीरत्न' सन्मान प्रदान करण्यात आला.

चलनवाढ व भाववाढ या दोन्ही संकल्पना परस्पर संबंधित आहेत. सामान्यपणे सरकारच्या लूटीच्या अंदाजपत्रकामुळे चलनवाढ होते.तसेच अनिवासी भारतीय नातेवाईकांना पैसा पाठवितात, भारतीय उद्योगपतींच्या विदेशात असणा-या उद्योगातील नफा स्वदेशात पाठवितात, विदेशी भांडवलदार भारतात गुंतवणूक करतात, तेव्हा चलनवाढ होत असते. शेतीतील उत्पादीत मालाच्या किंमती कमी करणे हा चलनवाढ रोखण्याचा मार्ग आहे असे मत अर्थतज्ञांनी मांडले. या मताला डॉ. देशमुखांनी तिव्र विरोध दर्शविला होता.

शेती उत्पन्नातून शेतक-यांच्या अत्यावश्यक गरजाही कधी कधी पूर्ण होत नाही. याउलट मुठभर श्रीमंताच्या हाती देशातील 75% पेक्षा जास्त संपत्ती आहे. अशा आर्थिक विषमतेमुळेच देशात चलनवाढ निर्माण होते उत्सा ठाम विश्वास डॉ.पंजाबराव देशमुख यांचा होता. शेतकरी ऊन, वारा, पाऊस, थंडीमध्ये कष्ट करून जगाला अन्नधान्य पुरवितो. त्यांना त्यातून फारसे उत्पन्न मिळत नाही. त्यांच्या मुलांना शासन संस्थेत कोणताही हक्क व सवलत नाही. शेती ही सर्वस्वी निसर्गावर अवलंबून असल्यामुळे शेतीतून येणारे उत्पन्न हे अनिश्चित स्वरुपाचे असते. अशावेळी उत्पन्न कमी झाल्यास शेतक-यांना आपला खर्च भागविण्याकरिता कर्ज काढावे लागते.

DOI PREFIX 10.22183
JOURNAL DOI 10.22183/RN
SIF 7.399

RESEARCH NEBULA
An International Refereed, Peer Reviewed & Indexed Quarterly Journal in Arts, Commerce, Education & Social Sciences

ISSN 2277-8071

त्यावरील व्याजाचा भार अधिक असल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होतो. भारतीय शेतीच्या अवनतीचे एक महत्त्वाचे कारण कर्जबाजारीपणाच आहे.तरीपण भारताच्या आर्थिक विकासात शेतीचे महत्वपूर्ण स्थान आहे. जर आपण शेतीक्षेत्रासाठी योग्य धोरणे निश्चित केली तर देशाच्या आर्थिक विकासाची गती वाढेल असे त्यांचे मत होते.शेतकरी कष्टकरी बहुजन समाजाच्या ह्या समस्या डॉ.पंजाबराव देशमुख यांना सोडवायच्या होत्या.त्यादृष्टीने त्यांनी 'भारत कृषक समाज' संस्थेची स्थापना केली.

**डॉ. पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक कार्य :-**

डॉ.पंजाबराव देशमुख राजकीय नेते असले तरी त्यांनी सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावली होती. समाजातील अनिष्ट चालीरिती, रुढी व परंपरा नष्ट करण्यासाठी त्यांनी विशेष प्रयत्न केला होता. हिन्दू धर्मातील जातीभेदाला त्यांनी विरोध केला होता, तसेच त्यांनी अस्पृश्यतेसारख्या अमानुष प्रथेविरुद्ध आवाज उठविला. नोव्हेंबर 1927 मध्ये अमरावती त्यांनी प्रयत्न करून इंद्रभुवन थीएटर अमरावती येथे 'वऱ्हाड अस्पृश्य परिषद' भरविली. या परिषदेचे अध्यक्ष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी भुषविले होते. 1928 मध्ये त्यांनी सार्वजनिक विहीरी अस्पृश्यांसाठी खुल्या केल्या होत्या. त्याच वर्षी अमरावती येथील अंबाबाई मंदिर अस्पृश्यांसाठी खुले करावे म्हणून सत्याग्रह केला होता.यावरून त्यांची अस्पृश्यांविषयीची तळमळ स्पष्ट होते. अमरावती येथे त्यांनी 'श्रध्दानंद छात्रालय' सुरु केले. या छात्रालयात सर्व जाती धर्माच्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येत होता. त्याचबरोबर मागासलेल्या जातीजमातीच्या उन्नतीसाठी त्यांनी 'अखिल भारतीय मागास जातीसंघाची' स्थापना केली.

**डॉ. पंजाबराव देशमुख यांचे इतर कार्य :-**

बहुजन समाजाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक वाटत होते. सुशिक्षित समाज आपला विकास करू शकते असा विश्वास त्यांना होता. डॉ.पंजाबराव देशमुख अमरावती जिल्हा कौन्सिलचे अध्यक्ष असतांना त्यांनी प्राथमिक शिक्षण सर्वासाठी सक्तीचे केले. तसेच अतिरिक्त कर बसवून त्यामार्गाने गोळा होणारा पैसा शिक्षणासाठी खर्च करण्याची योजना आखली. 1930 मध्ये प्रांतिक सरकारमध्ये शिक्षणमंत्री म्हणून कार्य करतांना ग्रामिण भागातील गरीब होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे, याकरिता विद्यार्थ्यांकरिता अनेक प्रकारच्या सोयी सवलती उपलब्ध करून दिल्या. त्यांनी 1 जुलै 1932 रोजी अमरावती येथे 'श्री.शिवाजी शिक्षण संस्थेची' स्थापना केली. या शिक्षणसंस्थेच्या वतीने विदर्भात अनेक शाळा, महाविद्यालये व वसतीगृहे सुरु करण्यात आली. त्यातून बहुजन समाजात मोठ्या प्रमाणावर शिक्षणाचा प्रसार होऊ शकला, शिक्षक हा शिक्षण व्यवस्थेतील एक महत्वाचा घटक असल्याने त्यांच्या हिताचा विचार करणे तितकेच महत्वाचे आहे हे त्यांनी ओळखले होते. त्यातूनच त्यांनी 'भारतीय प्राथमिक शिक्षक संघ' या संघटनेची स्थापना केली आणि त्यामार्फत प्राथमिक शिक्षकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.

**मूल्यमापन :-**

"डॉ.पंजाबराव देशमुख हे विदर्भातील बहुजन समाजाचे एक प्रमुख समाजसुधारक होते. त्यांनी बहुजन समाज, विद्यार्थी व शेतकरीवर्गाच्या उन्नतीसाठी व समाजाला जागृत करण्यासाठी आयुष्यभर प्रयत्न केले. त्याचबरोबर त्यांनी आर्थिक, राजकीय, सहकार, शिक्षण, स्वातंत्र्य चळवळ इत्यादी क्षेत्रात महत्व पूर्ण कार्य केले आहे. विदर्भातील बहुजन समाजाच्या जागृतीचे श्रेय त्यांच्याकडेच जाते. महाराष्ट्रात महात्मा फुले, शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील यासारख्या समाजसुधारकांनी बहुजन समाजास जागृत करून त्यांच्या प्रगतीचा मार्ग मोकळा करण्याचे जे बहुमुल्य कार्य केले. तोच वारसा डॉ पंजाबराव देशमुख यांनी पुढे चालविला म्हणून महाराष्ट्रातील बहुजन समाजाच्या शिल्पकारामध्ये त्यांचा समावेश केला जातो.

**संदर्भ :-**

1. देशमुख कल्पना, (1997), 'डॉ.पंजाबराव देशमुख यांचे सामाजिक योगदान', प्रदिप मुळे पब्लिशर्स, नागपूर.
2. मोहिते, वीर उत्तमराव, (1983), 'जागतिक कृषीक्रांतीचा विधाता लोकनेता डॉ. पंजाबराव देशमुख', सौ. भाग्यरेखा देशमुख पब्लिशर्स, अमरावती.
3. भिडे जी. एल., (2017), 'महाराष्ट्रातील समाजसुधारणेचा इतिहास', फड़के प्रकाशन, कोल्हापूर.
4. के, सागर, (2012), 'महाराष्ट्रातील समाजसुधारक व भारतीय विचारवंत', के. सागर पब्लिकेशन्स, पुणे.

ज्ञान-विज्ञान विमुक्तये
Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 40776

ISO 9001 : 2015 QMS
ISBN / ISSN

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Single Blind Review
Double Blind Review

Volume - XIII, Issue - I,
January - March - 2024
English / Marathi Part - I

Impact Factor
2023 - 7.428
(www.sjifactor.com)

Ajanta
Prakashan

CamScanner

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - XIII Issue - I January - March - 2024

ENGLISH / MARATHI PART - I

**Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal**
Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2023 - 7.428**
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

VOLUME - XIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2024
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | अंधश्रध्दा आणि महिला: मनपरिवर्तनाची आवश्यकता काळाची गरज<br>**डॉ. सुनंदा एकनाथराव आहेर** | १-४ |
| २ | बौध्द धर्मांतर सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तनाचा टप्पा<br>**उदय देवराम गायकवाड** | ५-८ |
| ३ | अभियोग्यता<br>**प्रा. जयश्री चंद्रकात चाटे** | ९-११ |
| ४ | यम देवता<br>**डॉ. अबोली रजनीश व्यास** | १२-१७ |
| ५ | मराठी संतांचे विचार व आजचे सामाजिक वास्तव<br>**डॉ. गणेश वैरागडे** | १८-२५ |
| ६ | भारतीय ज्ञान परंपरा व ऐतिहासिक संदर्भ<br>**श्रीमती. अल्का वानखडे**<br>**श्रीमती. कंचन अवस्थी** | २६-३१ |
| ७ | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्रियांच्या विकासासाठी केलेले योगदान<br>**जयदीप सुभाष ससाणे** | ३२-३५ |
| ८ | भारतीय आरमाराचे जनक छत्रपती शिवाजी महाराज<br>**प्रा. डॉ. नरवाडे जे. एम.** | ३६-३९ |
| ९ | नोबेल मानकरी डॉ. क्लाऊडीया गोल्डिनचे महिला आणि श्रमबाजाराविषयी आर्थिक विचार<br>**प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर** | ४०-४३ |
| १० | पोषण आहार व क्रीडा कामगीर<br>**डॉ. संघर्ष सुमंगल शृंगारे** | ४४-४८ |
| ११ | भारतीय कृषी व शेतकरी यांच्या उत्पन्न वाढीसाठी सरकारने केलेल्या प्रयत्नांचा एक विश्लेषणात्मक आढावा<br>**प्रा. डॉ. नागनाथ विठ्ठलराव कांबळे** | ४९-५५ |
| १२ | ओबीसी आरक्षण विषयक वृषयक वृत्तपत्रातील दिलेले स्थान व त्यामधील तुलना दै. सकाळ व दै. पुण्यनगरी<br>**माधुरी पुजांजी बज्जर** | ५६-६० |




CS CamScanner

VOLUME - XIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2024
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 7.428 (www.sjifactor.com)

# ९. नोबेल मानकरी डॉ. क्लाऊडीया गोल्डिनचे महिला आणि श्रमबाजाराविषयी आर्थिक विचार

**प्रा. डॉ. सुभाष रामचंद्र गुर्जर**
कला व वाणिज्य महाविद्यालय, वरवट बकाल, ता. संग्रामपूर जि. बुलढाणा.

**प्रस्तावना**

रॉयल स्वीडिश एकेडमी ऑफ सायंसेसने अर्थशास्त्रातील 2023 चा नोबेल पुरस्कार हार्वर्ड विद्यापीठातील अर्थशास्त्राच्या प्राध्यापक, अमेरीकन अर्थशास्त्रज्ञ क्लाउडीया गोल्डीन यांना जाहीर करण्यात आला. त्यांना महीलांचे श्रमबाजारावरील परिणाम याविषयी माहितीचे प्रसारण व विकास करण्याकरिता प्रस्तूत सन्मान देण्यात आला. हा पुरस्कार मिळवणारी ती जगातील तिसरी महिला आहे. डॉ. गोल्डिनला अर्थशास्त्रातील घटकाच्या तिच्या नाविन्यपूर्ण आणि विस्तृत अभ्यासासाठी ओळखले गेले. ज्यामुळे महिलांच्या श्रमशक्तीमध्ये सहभागाची व्याप्ती निश्चित केली गेली आणि ती सतत बदलत आहे. 18 व्या शतकाच्या उत्तरार्धापासून ते आजपर्यंत महिला आणि पुरुषांमधील वेतनातील तफावत कायम आहे. त्यांचे सविस्तर अध्ययन डॉ. गोल्डिन यांनी आपल्या विविध ग्रंथामध्ये आणि संशोधन पेपरमध्ये केले आहे.

**संशोधनाची उद्दीष्टे**

1. डॉ. क्लाऊडीया गोल्डिन यांचा शैक्षणिक, संशोधनात्मक व पुरस्कारासंबंधी परिचय अभ्यासणे.
2. महिलांचे उत्पन्न आणि श्रमबाजारातील भागिदारी याबद्दल माहिती अभ्यासणे.
3. आर्थिक इतिहास आणि श्रम अर्थशास्त्रातील योगदानाविषयी माहिती अभ्यासणे.

**डॉ. क्लॉउडीया गोल्डिन यांचा शैक्षणिक, संशोधन व पुरस्कार विषयक परिचय**

डॉ.क्लाऊडीया गोल्डिन यांचा जन्म 16 मे 1946 रोजी अमेरिकेतील न्यूयॉर्क येथे झाला. त्यांनी कार्नेल विद्यापीठातून 1967 मध्ये अर्थशास्त्रातील पदवी प्राप्त केली. 1969 मध्ये पदव्युत्तर पदवी आणि 1972 मध्ये डॉक्टरेट पदवी शिकागो विद्यापीठातून प्राप्त केली. त्यानंतर त्यांनी विस्कॉन्सिन विदयापीठ, प्रिन्स्टन विद्यापीठ, हार्वर्ड विद्यापीठ, पेनिसिल्व्हेनिया विद्यापीठ यासह विविध विद्यापीठात अर्थशास्त्राच्या प्राध्यापक म्हणून काम केले. 1990 मध्ये त्या हार्वर्ड विद्यापीठात अर्थशास्त्रात प्रोफेसर पद मिळविणाऱ्या पहिल्या महिला बनल्या. त्यानंतर नॅशनल ब्यूरो ऑफ इकॉनॉमिक रिसर्च National Bureau of Economic Research (NBER) च्या अमेरिकन इकॉनॉमि प्रोग्रामच्या संचालक, इकॉनॉमिक हिस्ट्री असोशिएशनच्या अध्यक्षा, इत्यादी पदाची जबाबदारी पार पाडली. 1984 ते 1988 या काळात त्या जर्नल ऑफ इकॉनॉमिक हिस्ट्रीच्या संपादक होत्या. या काळात त्यांनी आपल्या अध्ययनावर आधारित अनेक पुस्तके व लेख प्रकाशित केले 'अर्बन स्लेव्हरी इन द अमेरिकन साऊथ' हे पहिले पुस्तक लिहीले. 1978 मध्ये



CamScanner

'इकॉनॉमिक कॉस्ट ऑफ द अमेरिकन सिविल वार' हा पेपर लिहिला. 1987 मध्ये 'लिंग निरिक्षण खर्च आणि व्यावसायिक पृथ्थकरण', 1989 मध्ये 'विवाहीत महिलांचे जीवनचक्र श्रमशक्ती सहभाग' इत्यादी विषयावर विस्तृत लिखाण केले. या कार्याबद्दल त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. 1) 1990 मध्ये द रिचर्ड ए लेस्टर अवॉर्ड फॉर द स्टँडिंग बुक इन इंडस्ट्रियल रिलेशन अँन्ड लेबर इकॉनॉमिक्स, The richard A Lester award for the outstanding book in industrial relations and labor economics. 2) 2005 मध्ये कैरोलीन शॉ बेल पुरस्कार, Carolin shaw Bell Award. 3) 2008 मध्ये आर. आर. हॉकिन्स पुरस्कार, R.R.Hawkins Award. 4) 2009 मध्ये मिनसर पुरस्कार, Minsar Award, जॉन आर.कॉमन्स पुरस्कार, John R. Commons Award. 5) 2016 IZA price in Labour Economics. 6) 2019 BBVA फाउंडेशन फ्रंटीयर्स इन नौलेज अवॉर्ड, BBVA Foundation Frontiers in Knowledge Award. 7) 2020 Erwin plein Nemmers prize in Economics. 8) 2021 सोसायटी फॉर प्रोग्रेस मेडल, Society for Progress Award. 9) 2022 व्हिजनरी अवॉर्ड, Visionary Award from the council for Economic Education. 10)2023 नोबेल मेमोरियल पुरस्कार, Nobel Memorial prize in Economic Sciences.

**महिलांचे उत्पन्न आणि श्रमबाजारातील भागिदारी**

डॉ. क्लाऊडीया गोल्डिन यांनी दिर्घकाळापासून महिला उत्पन्न आणि श्रमबाजारातील भागिदारी संबंधी प्रथम विस्तृत विवरण प्रसिद्ध करण्याचे कार्य केले. त्यांच्या संशोधनामुळे रोजगार प्रमाण बदलण्याची कारणे आणि अस्तित्वात असलेले लिंग प्रमाण यांच्या मुख्य साधनांची माहिती झाली. त्यांच्या संशोधनाद्वारे स्पष्ट झाले की, जागतिक श्रमबाजारामध्ये महिलांचे प्रतिनिधित्व अल्पस्वरुपात आहे आणि जेव्हा ती काम करते, तेव्हा पुरुषांच्या तुलनेमध्ये कमी उत्पन्न मिळविते. यासाठी डॉ.गोल्डीन यांनी अनेक विवरणपत्राचा 200 वर्षापेक्षा जास्त कालावधीतील डेटा संकलीत केला. त्यातून त्यांनी असे स्पष्ट केले की, उत्पन्न आणि रोजगार दरामध्ये लैंगिक अंतर कसे आणि का बदलत गेले. त्यांचे संशोधन महिलांच्या करिअर आणि कुटुंबाच्या शोधाचा इतिहास, उच्च शिक्षणातील सहशिक्षण, महिलांच्या करिअरवर आणि लग्नाच्या निर्णयावर गर्भनिरोधक गोळीचा प्रभाव, सामाजिक सूचक म्हणून लग्नानंतरची महिलांची आडनावे, कारणे या विषयावर आधारित आहे. बहुसंख्य महिला आता पदवीधर असून त्यांच्या रोजगारीचे नवीन जीवनचक्र सुरु आहे. अमेरिकेमधील जलद औदयोगिकीकरण आणि महिला कामगार, बालकामगार आणि स्थलांतरीत कामगारवर्गीय कुटुंबाची भूमिका यावर काम केले तेव्हा असे लक्षात आले की, आर्थिक इतिहासात महिला कामगारांकडे मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष केल्या गेले, तेव्हा तिने महिला शक्ती कशी विकसित झाली आणि आर्थिक वृद्धी मध्ये महिलांची भूमिका काय आहे याचे विश्लेषण केले.

**आर्थिक इतिहास आणि कामगार अर्थशास्त्रातील योगदान**

डॉ. गोल्डिन यांच्या संशोधनाने महिला आणि पुरुषांमधील रोजगार आणि वेतनाच्या दरामधील फरकावर ऐतिहासिक दृष्टीकोन प्रदान केला. त्यांचे विश्लेषण हे लिंग आधारित संशोधनावर आधारित होते. आर्थिक वृद्धी महिलांसाठी नोक-या निर्माण करते



CamScanner

आणि आर्थिक वृद्धी जितकी जास्त काळ चालू राहते तितक्या महिलांसाठी अधिक नोकऱ्या असतात. हे त्यांच्या 20 व्या शतकाच्या डेटावर आधारित मत आहे. हे त्यांच्या जेंडर गैप या पुस्तकात मांडले गेले.

18 व्या शतकाच्या उत्तरार्धात अमेरिकेमध्ये कृषिप्रधान अर्थव्यवस्थेचे औदयोगिक अर्थव्यवस्थेमध्ये रुपांतर झाले. त्यामुळे महिलांच्या रोजगारात घट झाली ही प्रवृत्ती पुढे चालू राहीली. औदयोगिक रोजगार स्त्रियांना बहुतेक वेळ त्यांच्या घरापासून आणि कुटुंबापासून दूर घालवायचा होता, अशाप्रकारे विवाहीत स्त्रियांना घरकामगार आणि कौटुंबिक काळजीवाहू म्हणून गृहीत धरल्यामुळे त्यांना रोजगाराची जोड देणे अशक्य नसले तरी कठीण होते. पुढे विसाव्या शतकाच्या सुरुवातीला आर्थिक वृद्धी व्यतिरिक्त अनेक घटक उत्पादन कार्यामध्ये समाविष्ट झाल्यामुळे अमेरिकन महिलांच्या एकूण रोजगार दरात वाढ होण्यास मदत झाली. त्यामध्ये सेवा क्षेत्राचा उदय हा महत्वपूर्ण ठरला. कारण त्यामध्ये मोठ्या प्रमाणात कारकुनी आणि प्रशासकीय नोकऱ्या आणि महिलांसाठी मोठ्या प्रमाणात शैक्षणिक संधी उपलब्ध होत्या. परंतु पुढे सामाजिक पूर्वग्रह आणि कायदे यासारख्या इतर घटकांमुळे यामध्ये अडथळा निर्माण झाला होता. परिणामी विवाह केल्यामुळे काही व्यवसायामध्ये महिला कर्मचा-यांना काढून टाकणे आवश्यक होते. 1950 च्या दशकापूर्वीच्या तरुण स्त्रियांना अल्पकालावधीसाठी नोकरी दिली जाईल आणि नंतर त्यांनी लग्न केल्यानंतर नोकरी काढून घेतली जाईल असे निर्णय घेण्यात येत होते, त्यामुळे नोकरी करणाऱ्या महिला उमेदवारांना नापसंत करण्याची प्रवृत्ती होती. त्यातच 1960 च्या दशकाच्या उत्तरार्धात गर्भनिरोधक गोळया लागू केल्याने महिलांच्या रोजगाराला लक्षणीय चालना मिळाली. त्यामुळे तरुण स्त्रियांसाठी कुटुंब नियोजन सुलभ झाले आणि त्यांना त्यांच्या शैक्षाणिक आणि रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत मिळाली.

महिलांच्या रोजगाराच्या वास्तविक इतिहासाबद्दल गोल्डीनच्या संशोधनाने असे दाखवून दिले की, गेल्या दोन शतकामध्ये अमेरिकन महिलांच्या रोजगार दरतील बदल आर्थिक वृद्धीचे प्रतिनिधीत्व करणा-या रेषेच्या समांतर वरच्या दिशेने विस्तारलेल्या एका साध्या रेषेद्वारे आकृतीमध्ये प्रस्तूत केले जाऊ शकत नाही. एका अचूक प्रतिनिधीत्वाऐवजी U आकाराचा वक्र तयार होईल. आकृतीमधील वक्राची डावी बाजू 19 व्या शतकात महिलांच्या रोजगाराच्या घसरणीशी संबधित आहे. आणि उजवी बाजू 20 व्या शतकातील महीलांच्या रोजगाराच्या वाढीशी संबंधित आहे.

डॉ.गोल्डिनचे इतर ऐतिहासिक संशोधन महिला आणि पुरुषांमधील वेतनातील तफावतीशी संबंधित आहे त्यांनी असे दाखविले की, एकूण वेतनातील तफावत कमी होऊनही 20 व्या शतकाच्या सुरुवातीपासून आणि सेवा क्षेत्राच्या वृद्धीमुळे लैंगिक भेदभावाचा परिणाम म्हणून वेतनातील तफावत केवळ स्पष्ट करण्यायोग्य आहे, गोल्डिन ला असे आढळून आले की, आजही स्त्रीने अपत्याला जन्म दिल्यानंतर पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे वेतन कमी होते किंवा कमी दराने वाढते. याचे कारण म्हणते नवीन माता होय. कारण या ठराविक अपेक्षा पूर्ण करण्यास महिला कमी सक्षम आहेत.

**सारांश**

नोबेल पुरस्कार मिळविणा-या हार्वर्ड विद्यापीठातील अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ डॉ.क्लाऊडीया गोल्डिन यांनी महिला आणि श्रमबाजार याविषयी विस्तृत विश्लेषण केले आहे. त्यांनी स्त्री-पुरुष वेतनदरातील भिन्नतेबाबत सविस्तर संशोधन केल्याचे आढळते,



CamScanner

त्याच बरोबर श्रमबाजारात महिलांना मिळणा-या रोजगाराच्या संधी कमी प्रमाणात उपलब्ध होतात. त्याकरिता त्यांनी आर्थिक इतिहास आणि श्रमअर्थशास्त्रातील महिलांचे योगदान याविषयी सविस्तर विश्लेषण केले व महिलांचा श्रमबाजारातील वाटा वाढून त्यांना न्याय वागणूक मिळाली पाहीजे याकरिता उपाय सुद्धा स्पष्ट केले आहे. अशा स्वरुपाचे विस्तृत संशोधन करणा-या महिलेला 2023 या वर्षीचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाला आहे.

**संदर्भ**

1. www.nobelprize.org
2. www.academic accelerator.com
3. www.wikipedia
4. www.loksatta.com



CamScanner



ज्ञान-विज्ञान विमुक्तये

Peer Reviewed Refereed
and UGC Listed Journal
Journal No. 47037

ISO 9001 : 2015 QMS
ISBN / ISSN

ISSN 2278 - 8158

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# ROYAL

Single Blind Review

Double Blind Review

Volume - XI, Issue - II,
December - May - 2023-24
English Part - I

Impact Factor - 2023 - 6.701
(www.sjifactor.com)

Ajanta
Prakashan

CamScanner

ISSN 2278-8158
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# ROYAL

Volume - XII Issue - II December - May - 2023-24

English Part - I

**Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47037**

**Single Blind Review / Double Blind Review**

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING
2023 - 6.701
www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖

**Assit. Prof. Vinay Shankarrao Hatole**
M.Sc (Math's), M.B.A. (Mkt), M.B.A (H.R),
M.Drama (Acting), M.Drama (Prod & Dirt), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

CamScanner

# CONTENTS OF ENGLISH PART - I



| Sr. No. | Name & Author Name | Page No. |
|---|---|---|
| 10 | Importance of Research Design in the Research: Contextual Study<br>**Prof. Kasle Vithal Venkaty** | 73-80 |
| 11 | The Domestic Violence Act-A Boon or Bane<br>**Madhavi Joshi** | 81-86 |
| 12 | A Need for Quality in Research Guidance<br>**Dr. Subhash Ramchandra Gurjar** | 87-90 |
| 13 | Pradhan Mantri Fasal Bima Yojana (PMFBY) on Socio - Economic Development of Farmers (Special Refrance to Nanded District)<br>**Dr. Nitin Vijay Gaikwad** | 91-95 |
| 14 | Machine Learning Approaches for Sentiment Analysis in Multilingual Indian Social Media<br>**Prof. Jaymala More Chaudhari** | 96-102 |
| 15 | A Study of Digital Advertisement and its Impact on Consumer Buying Behavior in Electronic Product in Aurangabad City<br>**Miss. Ashwini Dattu Thanambir** | 103-108 |
| 16 | A Study on Fourier Transform and it's Application In Real Life<br>**Ranu Atmaram Chatarkar** | 109-115 |
| 17 | Dr. Babasaheb Ambedkar and Women Empowerment<br>**Dr. Vijay Jaysing Mane** | 116-122 |
| 18 | Assessing the Role of Emotional Intelligence in Teacher Effectiveness and Classroom Management<br>**Chetan Tripati**<br>**Anjali Shukla** | 123-128 |
| 19 | A Study of Customer Satisfaction towards EPOS in Osmanabad District<br>**Mr. Pandurang Laxman Aher**<br>**Dr. Bharat Vithhal Rathod** | 129-144 |
| 20 | The Role of Electronics Media in Shaping the Attitude of Women<br>**Vikas Prakash Jadhav** | 145-150 |





CamScanner

VOLUME - XII, ISSUE - II - DECEMBER - MAY - 2023-24
ROYAL - ISSN 2278 - 8158 - IMPACT FACTOR - 6.701 (www.sjifactor.com)

# 12. A Need for Quality in Research Guidance

**Dr. Subhash Ramchandra Gurjar**
Head Department of Economics, Arts & Commerce College, Warwat Bakal,
Dist. Buldhana (M.S.)

Research plays two important roles, first is to contribute to the general fund of knowledge and second it helps to solve many complex problems of the society. Therefore research is often classified as pure and applied. The pure, basic and fundamental research involves the asking and answering of questions that do not involve immediate solution of problems. It is generated because one gets intellectually involved in it. Applied research is conducted with a view to solve a given problem; it is more directly concerned with human needs, food, clothing, shelter, lifestyle etc. Thus while pure research advances the frontiers of knowledge, while applied research uses this knowledge to solve various social, economic, technological and other problems of the society.

A strong and effective higher education system is integrated to individual success, social progress and national prosperity for generating a knowledge-based society. The capacity needed to help research scholars to develop the ability to think critically, create, solve complex problems and master complex subject matter, is much more demanding on the guides than that needed by teachers to impart and develop routine skills. Thus research guides have to be both knowledgeable in their areas and extremely skilful in a wide range of analytical approaches to cater for the diverse research needs of every scholar. Guide's responsibility is, he must remain academically authoritative in his fields. He must hold high expectations of all scholars and set high standards for them. The percentage of scholars time spent on task must be consistently high, preparation, must be thorough and integral to their research activities. Research guide can expect their wards to perform more consistently, to be powerfully reinforced, thus fostering in themselves in their career.

**Effective Communication as a Means of Effective Guidance**

Communication is a network of interactions. The guide and scholar must have effective information interchange. A concentrated listening process by the research scholar is essential for effective research work.

**Characteristics of Good Guidance**

1. Good guidance is about motivating students to pursue their research activity and guiding them how to go about progressing and treating them as a consumer of knowledge.
2. Good guidance is about bridging the gap between theory and practice.
3. Good guidance should care, nurture and develop their minds.
4. Good guidance is about listening, questioning, being responsive and remembering that each research scholar is different.

Research guidance is defined as the organization of investigative work, to achieve authentic results, assuming that effective outcome will take place. This situation in made up of many parts.

There must be a willing research worker, facilities like a place and time for meeting and books and other material, an orderly and understood procedure for presenting, discussing and evaluating, grading etc. Hence, guidance is essentially an organizer enabling research scholars to conduct research effectively.

**Enhancing the Guiding and work Effectiveness**

Research guide has to improve his guiding effectiveness and communicate their expectation to their research scholars. Research activity is made easier when the scholars are informed of their progress. Positive feedback can motivate them to greater efforts because it makes their goal seem attainable. Presentation skills are extremely very important because they create the enthusiasm and interest that makes research scholars to be attentive. The materials should be reviewed regularly. The guide must get the scholars involved in identifying his research needs and outcomes. Giving the scholars chance to their ideas and to be creative will promote effective research activity. Begin with what the scholars know and allow to grasp new information quicker. Research scholars find working easy if they have opportunity to master simple concept first and then apply them to more complex one. The guides can improve their guidance based on the scholar's preferred style and plan activities using appropriate tools. Giving an opportunity to the research scholars and to apply their knowledge and build guide confidence paving way for problem solving feedback, and emotional support. Research activity is made easier when the scholars are informed to their progress. Reassuring scholars that they have progressed. These will be great help to research scholar to complete their research work.



CamScanner

**Developing Effective Guiding Skill**

Developing effective guiding skill is important in research work. Research students are assigned to assist a senior research scholar or in other research activities of the institution. Thus providing an opportunity to gain exposure to the subject, learn methods for testing, grading, providing feedback and become familiar with different styles of investigative activities. Thus at the end of research work research students get considerable experience in their research area. Due to this they attain an ability to take up teaching as a profession and thereafter become guides for other research scholars. Many resources are available in the institute to improve their research effectiveness like regular workshops, group projects, grading etc. Many equipment like flip charts. AV aids, OHPs, power point presentations and methodologies like lecture with discussion and group discussions with case studies and worksheets/ surveys come in handy when they have to present work before and an evaluation committee for award of Ph.D.

**Professional Elements Required for Guides**

Guides should know and understand the fundamental ideas, principle and structure of the disciplines, they guide and how to effectively steer the student towards the goal. Guides have to communicate effectively with their wards and establish clear the goals for research. Guides uphold high professional ethics with regards to their own conduct and respect their students and value their diversity. Research Guides engage with different type of scholars. They have to work productively with colleagues and to enhance the outcome of the scholars.

**Characteristics of Research Guides**

The qualities and characteristics of effective guide who demonstrates excellence in guiding are described in four categories

1. **Intrinsic motivation and the ability to motivate others** - Faculty is highly motivated to achieve excellence and motivate the scholars to reach their goals.
2. **Interpersonal skills** - An excellent faculty is always made available to research scholars.
3. **Knowledge base** - Facilities possess a broad range of intellectual skills and knowledge necessary for superior performance.
4. **Skills at applying that knowledge** - They stimulate intellectual learning environment in which students are active learners and make them think independently.



CamScanner

**Journey to excellence in Guiding**

A vision, a clear understanding to reach the goals, a utilization of knowledge to encourage innovation and improvement ideas.

**Recommendation to achieve excellence in Research Guidance**

1. Improving professional development practices and accountability.
2. Providing support to new guides during their initial stage.
3. Improving guide preparation and to rise the standards for research guides.
4. Recruiting talented and diverse people into the faculty profession.

**Conclusion**

Research which is not immediately focused or derived from issues of current policy concern often is the basis for future policy. Economics is developing social science. So, constant evaluation is required to provide desired level of teaching, talented and skilful manpower and quality research with innovations and experimentations. Adopting a career as a researcher is a job with difference. A career which brings change. The change not in your own life but in the life of the people around you. One of the most beneficial thing of adopting this as a career is that the name and fame can be achieved in a very short time. A good research can bring miracles but a bad research that is a research with evil mind can bring disaster .Any of the person can be a researcher or though he/she should have the desire to make career as a researcher, which can be both a full time or part time.

**References**

1. **H.D. Sharma & S. P. Mukharji:** Research in Economics and Commerce - Methodology and sources, 1976.
2. **Aglave Dr. Pradeep:** Research Methodology and Techniques, Vidya Publication, Nagpur, 2000.
3. **Gurjar Subhash & Rane Satish:** Social, Economic Research Methodology and Statistical Technique, Atharva Publication, Jalgaon, 2023.
4. **P. L. Bhandarkar:** Research Methodology, Maharashtra Vidyapeeth Granth Nirmiti Mandal, Nagpur, 1987.
5. **Sharma R. D.:** Research Method in Social Science, National Book Organization, New Delhi - 1990.
6. **Kothari K. R.:** Research Methodology, National Publishing House, Jaipur, 2002.



CamScanner